प्रेस प्रकाशन PRESS RELEASE

भारतीय रिझर्व्ह बँक
RESERVE BANK OF INDIA

संचार विभाग, केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
Department of Communication, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 022-22660502

वेबसाइट : www.rbi.org.in
Website : www.rbi.org.in
ई-मेल email: helpdoc@rbi.org.in

ऑगस्ट 2, 2019

**भारतीय रिझर्व्ह बँकेकडून सात बँकांवर आर्थिक दंड लागु**

जुलै 31, 2019 रोजीच्या एका आदेशान्वये, भारतीय रिझर्व्ह बँकेने (आरबीआय) सात बँकांवर आर्थिक दंड लागु केला असून, तो दंड, खाली दिल्याप्रमाणे, 'चालु खाती उघडणे व चालविणे ह्यासाठीची आचार संहिता', 'बँकांद्वारे चालु खाती उघडली जाणे - शिस्तीची आवश्यकता', 'बँकांद्वारे देयकांचे डिसकाऊंटिंग/रिडिसकाऊंटिंग', 'भारतीय रिझर्व्ह बँक (वाणिज्य बँका व निवडक वित्तसंस्थांद्वारे फसवणुकींचे वर्गीकरण व अहवाल) निर्देश 2016', 'निधीचा अंतिम वापर–देखरेख', आणि 'ताळेबंदाच्या तारखेस असलेल्या ठेवी' ह्यावर आरबीआयने दिलेल्या सूचनांच्या काही तरतुदींचे अनुपालन न केले गेल्याने लावण्यात आला आहे.

| अनु. क्र. | बँकांची नावे | दंडाची रक्कम (रु. करोड मध्ये) |
|---|---|---|
| 1 | अलाहाबाद बँक | 2.0 |
| 2 | बँक ऑफ बडोदा | 1.5 |
| 3 | बँक ऑफ इंडिया | 1.5 |
| 4 | बँक ऑफ महाराष्ट्र | 2.0 |
| 5 | इंडियन ओव्हरसीज बँक | 1.5 |
| 6 | ओरिएंटल बँक ऑफ कॉमर्स | 1.0 |
| 7 | युनियन बँक ऑफ इंडिया | 1.5 |

बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या (तो अधिनियम) कलम 46 (4)(आय) व कलम 51 (1) सह वाचित कलम 47 अ (1)(क) खाली आरबीआयला देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन लागु करण्यात आला आहे. ही कारवाई विनियामक अनुपालनामधील त्रुटींवर आधारित असून, वरील बँकेने तिच्या ग्राहकांबरोबर केलेले व्यवहार किंवा करार ह्यांच्या वैधतेशी संबंधित नाही.

**पार्श्वभूमी**

एका गटाच्या कंपन्यांच्या खात्यांची तपासणी आरबीआयकडून करण्यात आली होती व त्यात आढळून आले की, वरील बँकांनी, आरबीआयने दिलेल्या वरील सूचनांपैकी एक किंवा अधिक सूचनांचे अनुपालन केलेले नाही. वरील सूचनांचे अनुपालन न केल्याबद्दल दंड का लावण्यात येऊ नये ह्याची कारणे देण्यास वरील बँकांना नोटिसा पाठविण्यात आल्या होत्या. वरील बँकांकडून मिळालेली उत्तरे व वरील बँकांनी वैय्यक्तिक सुनावणीच्या दरम्यान केलेली सादरीकरणे व केलेल्या अतिरिक्त सादरीकरणांची (असल्यास) तपासणी विचारात घेऊन आरबीआयने निष्कर्ष काढला की, आरबीआयने

दिलेल्या सूचनांचे अनुपालन न केले गेल्याचे दावे सिध्द होत असून त्यासाठी, प्रत्येक बँकेने केलेल्या अनुपालनाच्या प्रमाणावर आधारित वरील सातही बँकांना आर्थिक दंड लावणे आवश्यक आहे.

**योगेश दयाल**
मुख्य महाव्यवस्थापक

**प्रेस प्रकाशन : 2019-2020/321**